Wed, 31 Jan-18; Loksatta - Mumbai; Size : 230 sq.cm.; Circulation:221377;
Page : 8

# ‘रिलायन्स स्मार्टमनी’द्वारे विविध वित्तीय उत्पादनांची ऑनलाइन खरेदी

**व्यापार प्रतिनिधी, मुंबई**

**म्युच्युअल फंड्स,** समभाग, झटपट कर्ज सुविधा अथवा पोर्टफोलियो मॅनेजमेंट (पीएमएस) सेवा, कॉर्पोरेट एफडी, बॉण्ड, रोबो ॲडव्हायजरी वगैरे सेवा केवळ शहरी ऐपतदार वर्गाचा विशेषाधिकार राहिला नसून, डिजिटल युगात त्यांचे सार्वत्रिकीकरण होऊन ग्रामीण आणि निमशहरी घटकांनाही त्याचा लाभ घेता यावा या उद्देशाने रिलायन्स सिक्युरिटीज लिमिटेड या रिलायन्स कॅपिटल लिमिटेडच्या ब्रोकिंग आणि वितरण शाखेने नवीन सर्वसमावेशक वेबस्थळ ‘रिलायन्स स्मार्टमनी’ची (reliancesmartmoney.com) पायाभरणी केली आहे. यामुळे छोट्या गुंतवणूकदारांना निव्वळ तीन क्लिक्समध्ये कोणतीही वित्तीय उत्पादन ऑनलाइन खरेदी करता येणार आहे. गुंतवणूकदारांच्या सर्व वित्तीय गरजांसाठी एकाच छताखाली सर्व पर्यायांची सोय असलेले हे असे पहिलेच अभिनव संकेतस्थळ असेल, असा दावा रिलायन्स सिक्युरिटीजचे मुख्याधिकारी बी. गोपकुमार यांनी केला.

रिलायन्स कॅपिटलचा उद्देश वित्तीय सेवांसाठी भारताची सर्वात मोठी डिजिटल बाजारपेठ निर्माण करण्याचा आहे. या संकेतस्थळावर सुरुवातीला २२ हजारांहून अधिक उत्पादने उपलब्ध करून देण्यात येतील. पुढच्या वर्षी ही संख्या वाढून ५० हजारांच्या वर जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. वित्तीय योजनांमध्ये ग्रामीण आणि शहरी गुंतवणूकदारांमध्ये दिसून येणारी दरी हा अभिनव डिजिटल मंच भरून काढेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.